# कोंडी मुंबईची

## मेट्रो ३ प्रकल्पच वाहतूक कोंडी फोडणार



मुंबई मेट्रो ३ प्रकल्प २०२१ मध्ये सुरू झाल्यानंतर प्रतिदिन १२ लाख प्रवाशांचा प्रवास सुकर होणार आहे. पण त्यासोबतच रस्त्यावरील तब्बल ४ लाख ५० हजार वाहनांच्या फेऱ्या कमी होण्यासाठी या प्रकल्पाचा नक्कीच मोठा उपयोग होईल. त्यापुढच्या टप्प्यात २०३१ मध्ये या प्रकल्पातील क्षमतावाढीमुळे प्रतिदिन १७ लाख प्रवाशांना या टप्प्यात प्रतिदिन प्रवास करणे शक्य होईल. प्रतिदिन ६ लाख ५० हजार वाहनांच्या फेऱ्या कमी होतील. मेट्रो रेलसारख्या सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधेतून रोजगाराची केंद्रे असणाऱ्या बीकेसी, फोर्ट, काळबादेवी, वरळी, एमआयडीसी, सिप्झसारखे भाग जोडले जातील. त्यासोबतच हा प्रकल्प डोमेस्टिक आणि इंटरनॅशनल अशा दोन्ही विमानतळांना कनेक्टिव्हिटी देणार आहे. मेट्रो ३ प्रकल्प नक्कीच रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

- अश्विनी भिडे, व्यवस्थापकीय संचालिका, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन



मुंबई मेट्रो प्रकल्प सुरू असल्यामुळे वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत जात आहे. आज मुंबईत सरासरी २ हजार किलोमीटरचे रस्ते आहेत. या रस्त्यांची क्षमता १० ते १२ लाख वाहनांची आहे. मात्र मुंबईत सध्या २० लाखांपेक्षा जास्त वाहने धावतात. त्यामुळे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. त्यात मेट्रोच्या कामामुळे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडली आहेत. यांचा फटका थेट सार्वजनिक वाहतुकीला बसत आहे. सरकारने मुंबईच्या रस्त्यांची रुंदी वाढवणे गरजेचे आहे. मुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

- विवेक पै, वाहतूक तज्ज्ञ, मुंबई

## मेट्रो प्रकल्पाचा सरकारकडून विचार नाही



मेट्रो प्रकल्प योग्य की अयोग्य याचा सरकारने अभ्यास केला आहे, असे वाटत नाही. प्रतितास १ लाख ८० हजार प्रवासी वाहून नेणाऱ्या व्यवस्थेची सध्या मुंबईला गरज आहे. रेल्वेची क्षमता तासाला १ लाख ८० हजार प्रवासी वाहून नेण्याची क्षमता आहे. पण सध्या रेल्वे तासाला ३ लाख ६० हजार प्रवाशांची नेआण करते. त्यामुळे मेट्रो किंवा अन्य पर्यायाचा सरकारने विचार करणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी यावर विचार केला नाही. मेट्रोची क्षमता ताशी ९६ हजार प्रवासी वाहून नेण्याची आहे. त्यामुळे मेट्रोमुळे वाहतूक कोंडी सुटेल, असे म्हणणे चुकीचे आहे, असे मत वाहतूक तज्ज्ञ सुधीर बदामी यांनी व्यक्त केले आहे.

## आयआयटी मुंबई अहवाल २००९

मेट्रो २ बी एलिव्हेटेड प्रकल्प हा भूयारी पद्धतीने उभारला असता, तर २०४५ पर्यंत मुंबईकरांची १७ हजार ६६० कोटींची बचत झाली असती. सध्याच्या एलिव्हेटेड मेट्रो प्रकल्पामुळे रस्त्याची रूंदी ३० टक्क्यांनी कमी होणार आहे. मेट्रो प्रकल्पामुळेच नऊ नियोजित फ्लायओव्हर रद्द करण्यात आले आहेत. आयआयटी मुंबईने २००९ मध्ये दाखल केलेला अहवाल हा जोगेश्वरी आणि वांद्रे दरम्यानच्या प्रकल्पाच्या निमित्ताने सादर केला होता. वेस्टर्न एक्स्प्रेसची सध्याची रूंदी २०० फुटावरून २३० फूट करण्याचेही या अहवालात सुचवले होते.



## वाहतूक कोंडीतून सुटकेसाठी कोटीची उड्डाणे

ठाणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका व्हावी यासाठी एमएमआरडीएने २२३ कोटी तर ठाणे महापालिकेने चार कोटी ३७ लाख रुपये खर्च करून संत नामदेव चौक (महात्मा गांधी पथ), आल्मेडा जंक्शन (एलबीएस रोड), माँसाहेब मीनासाहेब ठाकरे चौक अशा तीन ठिकाणी उड्डाणपुल बांधले. यापैकी सद्यस्थितीत वंदना सिनेमागृहाजवळील उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असला तरी वाहतूक कोंडीचा प्रश्न अद्यापही 'जैसे थे'च आहे. शहरातील आराधना सिनेमा, अल्मेडा चौक, खोपट या चौकातील वाहतूक कोंडीवरही कोणता पर्याय पालिकेकडून काढण्यात येत नाही. घंटाळी येथून आराधना सिनेमाकडे जाताना तीन पेट्रोलपंप येथे तर हरी निवास सर्कल येथून तीन पेट्रोल पंप परिसरात वाहतूक कोंडी नेहमीचीच आहे. खोपट, आंबेडकर चौकातील सीएनजी गॅस भरणा केंद्रामुळे तेथील गाड्यांची रांग थेट आंबेडकर चौकापर्यंत पोहोचते. प्रचंड गाजावाजा करत शहरातील रस्ते रुंद करण्यात आले. मात्र या रुंद झालेल्या रस्त्यांवर दुकानदारांनी आपली वाहने उभी केली आहेत, तर कोठे गॅरेजवाल्यांनी रस्ते व्यापले आहेत. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच आहे.

### महमद अली रोड

महमद अली रोड हा नेहमीच गजबलेला परिसर आहे. या भागात रस्त्यावर लावण्यात येणारे स्टॉल आणि दुतर्फा उभ्या करण्यात येणाऱ्या गाड्या यामुळे या परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. महमद अली रोडपासून नळबाजार, भुलेश्वर, पायधुणी हे सतत गजबज असलेले परिसर जवळ आहेत. त्यामुळे येथे खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी असते. या परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही वर्षांपूर्वी जे.जे. हॉस्पिटल ते कॉफर्ड मार्केट असा भलामोठा पूलही उभारण्यात आला होता. परंतु तरीही या परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी असते.

### शिवसेना भवन, दादर

मेट्रोमुळे भविष्यात मुंबईकरांचा प्रवास सुखकर होणार असला तरी सध्या मेट्रोमुळे अनेक ठिकाणी असलेल्या खोदकामामुळे मुंबईकरांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. दादर येथे सेनाभवनच्या बाजूलाच मेट्रो ३ चे काम सुरू आहे. त्यामुळे या चौकात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी पाहायला मिळते. मेट्रोच्या कामामुळे प्रभादेवीकडे जाणारा रस्ता अर्धा बंद केल्यामुळे वाहनांना रस्ता अपुरा पडतो. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी येथे वाहतूक विभागातर्फे योग्य ती काळजी घेण्यात येते. परंतु कोंडी टाळण्यात त्यांना फारसे यश येत नाही.

### सिद्धिविनायक मंदिर

दादर पश्चिमेकडे असलेल्या सिद्धिविनायक मंदिराकडे जाताना अनेकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. गणरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड असल्याने या परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. त्यातच आता सिद्धिविनायक मंदिराशेजारीच मेट्रोचे काम सुरू आहे. त्यामुळे अधिकच वाहतूक कोंडी होत असते. मेट्रोमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे कमी वेळात पार होणारे अंतर कापण्यासाठी बराच वेळ जातो.

### वांद्रे कुर्ला संकुल

वांद्रे कुर्ला संकुलात मेट्रो ३ आणि मेट्रो २ बी प्रकल्पाअंतर्गत दोन्ही मेट्रो प्रकल्पांचे इंटिग्रेशन असणार आहे. बीकेसीमध्ये मेट्रोचे सर्वात मोठे स्टेशन असणार आहे. या प्रकल्पाच्या निमित्ताने बीकेसीमध्ये सध्या कुर्ला आणि वांद्रे अशा दोन्ही दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा फटका बसत आहे. भारतनगर ते कलानगर या पट्ट्यात दोन्ही दिशेने जाणाऱ्या वाहतुकीवर याचा परिणाम होतो. आयकर भवन ते कलानगरदरम्यान दोन्ही बाजूला मेट्रो २ बी प्रकल्पासाठी बॅरिकेड्स लावल्याने या मार्गावरील एक लेन वाहतुकीसाठी कमी झाली आहे. त्यामुळे आयकर भवनजवळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.



(संकलन - सौरभ शर्मा, विनायक डिगे, किरण कांरडे, नितीन बिनेकर, कृष्णा सोनारवाडकर, संतोष गायकवाड, सुबोध शाक्यरत्न)